You Tube Live
f LIVE
सह्याद्री न्यूज चॅनलच्या थेट प्रक्षेपण (LIVE) कार्यक्रमास हजारो प्रेक्षकांनी प्रतिसाद दिला त्याबद्दल आभार !!
कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपण (LIVE) साठी संपर्क
9011708840, 9673560360

RNI. MAHMAR/2018/77866

मराठी साप्ताहिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com
संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे

वर्ष ५ | DIGITAL EDITION | शुक्रवार, दि. १५ जुलै २०२२ | पृष्ठ ४ | मुल्य ५ /- रूपये

# पूर परिस्थितीची पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी 'ऑनफील्ड'





**चंद्रपूर / प्रतिनिधी**

संपूर्ण जिल्ह्यात गत सहा-सात दिवसांपासून पावसाची संततधार सुरू असल्यामुळे पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यातच चंद्रपूर येथील इरई धरणाचे सर्व सातही दरवाजे उघडल्याने शहरातील काही भागात पाणी जमा झाले आहे. या भागाची पाहणी करण्याकरिता जिल्हाधिकारी अजय गुल्हाने यांनी काही भागाला प्रत्यक्ष भेट देवून पूरग्रस्तांशी संवाद साधला.

जिल्हाधिकाऱ्यांनी सुरुवातीला सिस्टर कॉलनी, उमाटे ले-आउट येथील नागरी वस्त्यांमध्ये जमा झालेल्या पूराच्या पाण्याची पाहणी केली. त्यानंतर आंबेकर ले-आउट (घोटकाळा) येथे पूरग्रस्तांना स्थलांतरीत केलेल्या ज्योतिबा फुले प्राथमिक शाळेला भेट देवून येथे असलेल्या नागरिकांशी संवाद साधला. पिण्याचे शुद्ध पाणी आणि जेवण वेळेवर देण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात तालुकानिहाय आढावा : जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टिचा फटका अनेक तालुक्यांना बसला आहे. याबाबत जिल्हाधिकारी अजय गुल्हाने यांनी तालुकानिहाय आढावा घेतला. यात तालुक्याची पूर परिस्थिती, जीवित-वित्त हाणी, किती भागात पाणी शिरले, घरांचे झालेले नुकसान, अंशतः व पूर्ण पडझड झालेल्या घरांची संख्या, जनवरांचे झालेले नुकसान, स्थलांतरीत केलेल्या नागरिकांची संख्या आदिंचा आढावा घेतला.

बैठकीला अतिरिक्त जिल्हाधिकारी विद्युत वरखेडकर, निवासी उपजिल्हाधिकारी विशाल कुमार मेश्राम, तहसीलदार नीलेश गौंड आदी उपस्थित होते.

## चंद्रपूर जिल्हयातील पुरग्रस्त नागरिकांना अविलंब नुकसान भरपाई द्यावी- आ. मुनगंटीवार

**चंद्रपूर / प्रतिनिधी**

अतिवृष्टी व संततधार पावसामुळे चंद्रपूर जिल्हयात नागरिकांच्या घरांचे, शेतीचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले आहे. ईरई धरणाचे सातही दरवाजे उघडल्याने पुर परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत झालेल्या नुकसानाचे तातडीने पंचनामे करुन अविलंब नुकसान भरपाई देण्यात यावी, असे निर्देश माजी अर्थमंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहे. याबाबत आपण मुख्यमंत्र्यांना भेटून त्यांच्याशी चर्चा करणार असल्याचे आ. मुनगंटीवार यांनी म्हटले आहे.



अतिवृष्टीमुळे जिल्हयातील सर्वच तालुक्यांमध्ये मोठया प्रमाणावर नुकसान झाले आहे. पुरपरिस्थितीमुळे अनेक गावांचा संपर्क तुटला असुन काही महत्वाचे मार्ग बंद झाले आहे. त्यामुळे जनजीवन पुर्णपणे विस्कळीत झाले आहे. अजुनही पाऊस सुरुच असल्यामुळे शेतीचे नुकसान व घरांची संख्या वाढू शकते. अशा परिस्थितीत पुरग्रस्त नागरिकांना तातडीने मदतीचा हात देण्याची आवश्यकता आहे. अनेक गावांमध्ये वीज पुरवठा खंडीत झाला आहे. तो सुध्दा पुर्ववत करण्याची आवश्यकता आहे. पशुधन जखमी झाले आहे. त्यांच्यावर उपचार करण्यासाठी पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये औषध साठा उपलब्ध होणे आवश्यक आहे. या सर्व गोष्टींबाबत तातडीने कार्यवाही करुन नागरिकांना मदत देण्यात यावी असेही आ. मुनगंटीवार यांनी म्हटले आहे.

## आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या सुचनेने उपाययोजना सुरु
## वे.को.लि. च्या ओव्हर बर्डनमुळे भटाळी गावात पाणी

**चंद्रपूर / प्रतिनिधी**

चंद्रपूर तालुक्यातील भटाळी गावाच्या आसपास वे.को.लि. चे अनेक ओव्हर बर्डनचे डोंगर तयार झाले आहेत. उन्हाळयाच्या दिवसात या ओव्हर बर्डनमुळे धुळीचे साम्राज्य गावात पसरते ज्यामुळे गावकऱ्यांना प्रचंड त्रास होतो. पावसाळयात यावर्षी अचानक आलेल्या मोठया पावसाने या ओव्हर बर्डनवरुन गावात मोठया प्रमाणात पाणी शिरले ज्यामुळे गावक-यांचे



नुकसान झाले व त्यांच्या मनात भिती निर्माण झाली. ही सर्व घटना आ. सुधीर मुनगंटीवार यांना कळल्यावर त्यांनी ताबडतोब भाजपाचे पदाधिकारी व त्यांच्या स्विय सहाय्यकांना भटाळी पाठवुन उपाययोजना करण्यास सांगीतले.

त्यानुसार भाजपाचे जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांनी त्याठिकाणी भेट देवुन वे.को.लि. अधिकाऱ्यांबरोबर संयुक्त दौरा केला. या ओव्हर बर्डनवर पडणाऱ्या पाण्याला नाला करुन ते पाणी नदीकडे वळविण्यास वे.को.लि. ला सांगीतले. त्यानुसार वे.को.लि. ने रात्रीच काम करुन ते पाणी वळविण्यास सुरुवात केली. या दौ-यात माजी उपसरपंच सुभाष गौरकार, सरपंच राकेश गौरकार, अनिल डोंगरे, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, भटाळी गावातील नागरिक मोठया संख्येने उपस्थितीत होती.

यापुढे ओव्हर बर्डनचे पाणी गावात येणार नाही याकरीता स्थायी उपाययोजना करण्याचे निर्देश देवराव भोंगळे यांनी वे.को.लि. ला केले. यासर्व समस्येमध्ये आ. मुनगंटीवार यांनी त्वरित लक्ष घालुन उपाययोजना केली याकरीता भटाळी वासियांनी आ. मुनगंटीवार यांना धन्यवाद दिले आहेत.

## अधिकाऱ्यांसह आमदार किशोर जोरगेवार यांनी केली पुरग्रस्त भागाची पाहणी

### अधिकाऱ्यांना सुचना, नागरिकांच्या अस्थायी निवाऱ्याचीही पाहणी

**चंद्रपूर / प्रतिनिधी**

आमदार किशोर जोरगेवार यांनी अधिकाऱ्यांसह चंद्रपूरातील पुरग्रस्त भागाची पाहणी केली आहे. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी पुलाचे पाणी घरात शिरल्याने बेघर झालेल्या नागरिकांसाठी करण्यात आलेल्या अस्थायी निवाऱ्याचीही पाहणी केली असुन येथील सोयी सुविधांचा आढावा घेतला आहे. यावेळी चंद्रपूर महानगर पालिकेचे आयुक्त राजेश मोहिते, अतिरिक्त आयुक्त विपीन पालिवा, तहसिलदार निलेश गोंड शहर अभियंता महेश बारई, अभियंता विजय बोरीकर, मनपा स्वच्छता निरिक्षक संतोष गर्गेलवार, मनपा सॅनिटरी इन्स्पेक्टर मडावी, भुपेश गोठे, चांदा रयतवारी विभागाचे तलाठी प्रवीण वरभे, पडोली विभागाचे



तलाठी विशाल कुरेवार अंभोराचे उपसरपंच प्रभाकर ताजने, ग्रामपंचायत सदस्य लवलेश निषाद, सुदर्शन निषाद, सुगवेंदरसिंग भट्टी आदिंची उपस्थिती होती.

मागील आठवडा भरापासून सुरु असलेल्या पावसामुळे शहरात पुलस्थिती निर्माण झाली आहे. दरम्याण आज आमदार किशोर जोरगेवार यांनी पुरग्रस्त असलेल्या भागाची पाहणी केली आहे. यावेळी अधिकाऱ्यांसह त्यांनी रहमतनगर, सिस्टर कॉलनी, भिवापूर येथील भंगाराम वार्ड, हनुमान खिडकी, दालदमल, पठाणपूरा गेट दाताला पुलीया, विठ्ठल मंदिर वार्ड या ठिकाणी जाउन पुरपरिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी झालेल्या नुकसाणीचीही आमदार किशोर जोरगेवार यांनी माहिती जाणून घेतली. या भागात प्रशासनाच्या वतीने सुरु असलेल्या मदत कार्याचीही आमदार किशोर जोरगेवार यांनी माहिती घेतली. आमदार किशोर जोरगेवार यांच्या सुचने नंतर यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने या भागात मदत कार्य सुरु करण्यात आले आहे. याचाही यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी आढावा घेतला. पुलाचे पाणी घरात शिरल्याने प्रशासनाच्या वतीने पिढीत नागरिकांसाठी तात्पुरत्या स्वरुपाच्या निवाऱ्याची व्यवस्था करण्यात आली आहे. यातील महाकाली कन्या शाळा, माना प्राथमीक शाळा, शहिद भगतसिंह शाळा, महात्मा फुले शाळा, किदवाई स्कुल, नागाचार्य मंदिर, गुरुमाउली मंदिर या ठिकाणची आमदार किशोर जोरगेवार यांनी पाहणी करत येथील नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सोयी सुविधांची माहिती घेतली. तसेच यावेळी प्रशासनाला आवश्यक त्या सुचनाही केल्या आहे. तसेच दाताडा परिसरातील नागरिकांच्या घरात पाणी शिरले आहे. अशा नागरिकांच्या राहण्याची व्यवस्था यावेळी गुरुसाई पॉलिटेक्नीक येथे तर लखमापुर येथील पुल पिढीत नागरिकांच्या राहण्याची व्यवस्था ताज काटा कॉम्प्लेक्स येथे करण्यात आली. या प्रसंगी यंग चांदा ब्रिगेडचे महानगर जिल्हाध्यक्ष पंकज गुप्ता, युवा नेते अमोल शेंडे, अल्प संख्याक विभागाचे युथ शहर प्रमुख राशेद हुसेन, विश्वजित शाहा, सलिम शेख, विलास सोमलवार, आदिवासी विभागाचे जिल्हाध्यक्ष जितेश कुळमेथे, विनोद अनंतवार, इमरान शेख, ॲड. परमाहंस यादव, राम जंगम, नितेश गवळी आदिंची उपस्थिती होती

## रस्ता देतो अपघाताला आमंत्रण

**शंकरपूर / प्रतिनिधी**

येथून जवळच असलेल्या साठगाव येथील भिवापूर रस्ताची गिट्टी उखडल्याने हा रस्ता अपघाताला आमंत्रण देत आहे

साठगाव हे गाव चंद्रपूर नागपूर व भंडारा जिल्ह्याच्या सीमेवर बसलेल आहे त्यामुळे या गावावरून भंडारा नागपूर व चंद्रपूर जाणारे मार्ग तयार करण्यात आलेल्या चंद्रपूर जिल्ह्याच्या सीमेमध्ये येत असलेल्या साठगाव ते भिवापूर हा जवळपास दहा किलोमीटरचा रस्ता अतिशय खराब झाला असून जागोजागी खड्डे पडलेले आहेत या खड्डयामुळे प्रवास करणाऱ्या वाहनांना छोटे-मोठे अपघात झालेले आहे. या संदर्भात वारंवार आमदार जिल्हा परिषद सदस्य तथा संबंधित विभागाला विनंती अर्ज सादर करूनी अजूनही या रस्त्याचे बांधकाम झालेले नाही त्यामुळे या रस्त्याचे बांधकाम लवकरात लवकर करावे अशी मागणी नागरिकांनी गेलेली आहे.

## हंसराज अहीर यांनी केली शहरातील पूरग्रस्त भागाची पाहणी



**चंद्रपूर / प्रतिनिधी**

जिल्हात मागील ४-५ दिवसांपासून सतत अतिवृष्टी होत आहे. इरई धरणाचे सर्व ७ दरवाजे उघडल्याने चंद्रपूर शहरात पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. शहरातील रहमतनगर, सिस्टर कॉलनी, विठोबा खिडकी, पठाणपुरा या पूरग्रस्त भागात पूर्व केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराजजी अहीर यांनी भेट देत पूर परिस्थितीची पाहणी केली. पुरग्रस्त कुटुंबाना मदत करण्यात, त्यांना सुरक्षित स्थळी हलविण्यात, जेवणाची व्यवस्था यासाठी महानगर प्रशासनाचे अधिकारी, कर्मचारी, माजी नगरसेवक राहुल पावडे, प्रशांत चौधरी, सविता कांबळे, या भागातील नागरिक, महावीर इंटरनॅशनल व अन्य सामाजिक संस्था चांगले कार्य करीत असल्याचे अहीर म्हणाले. महानगर पालिका अधिका?यांची, माजी नगरसेवकांची, नागरिकांची भेट घेत अहीर यांनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी भाजपा नेते खुशाल बोन्डे, विनोद शेरकी, सचिन कोतपल्लीवार, राजेंद्र खांडेकर, सूर्यकांत कुचनकर, राजू येले, रवी चहारे, पूनम तिवारी, गौतम यादव व अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## कोटगुल क्षेत्रातील ४० गावांमधील विद्युत पुरवठा वारंवार खंडितमुळे नागरिक झाले त्रस्त

**कोरची / प्रतिनिधी**

कोरची तालुका मुख्यालापासून ३५ किलोमीटर अंतरावर येत असलेल्या कोटगुलसह या क्षेत्रातील ४० गावातील विद्युत पुरवठा मागील पाच ते सहा दिवसापासून वारंवार खंडित होत असल्याने नागरिकांना खूप त्रास होत असून वरिष्ठ अधिकाऱ्यांचे याकडे सर्रास दुर्लक्ष होत आहे.

> "चार पाच दिवसापासून या मार्गावरील विद्युत पुरवठ्यावर दोन ते तीन पोलांचे इन्सुलेटर फुटले, वीज झाडावर कोसळल्याने झाड पोलावर पडणे, ट्रान्सफार्मर मध्ये बिघाड झाले अशा कारणांमुळे कोटगुल परिसरात विद्युत पुरवठा खंडित झाले होते ते बुधवारी सायंकाळी पूर्वरत सुरळीत झाले आहे.
>
> **एल लांडगे अभियंता, वीज वि कं धानोरा.**

सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू झाले असून रात्रोला अनेक सरपटणाऱ्या जीव जंतूंची घरात शिरण्याची भीती नागरिकांना झाली आहे यामुळे एखाद्या ग्रामीण कुटुंबातील सदस्याला विषारी साप, विंचू चावल्यास आणि त्याचे जीव गेल्यास विद्युत विभागातील अधिकारी व कर्मचारी जबाबदार राहतील काय असा प्रश्न येथील नागरिकांना पडला आहे.

कोटगुल क्षेत्रातील अनेक गावे ही घनदाट जंगल परिसराला लागून आहेत त्यामुळे रात्री विद्युत पुरवठा खंडित होत असल्याने अशा पद्धतीचा धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही कारण वारंवार विद्युत पुरवठा खंडित होत असल्याने या क्षेत्रातील बहुतेक नागरिकांचे मोबाईल बॅटऱ्या लोव्ह झाल्या नंतर त्या चार्जिंग होत नसल्याने एखादया आपत्कालीन घटनेची माहिती सुद्धा ते देऊ शकत नाही.

अनेक विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामामध्ये अडचणी निर्माण होत आहेत तर अनियमित विद्युत पुरवठ्यामुळे नागरिकांचे महागडे विद्युत उपकरणेही खराब होत आहेत.

## डॉ. नामदेव किरसान पूरग्रस्तांना करणार १ लक्ष रुपयांची मदत

### वाढदिवसाच्या निमित्ताने घेतले संकल्प





**कोरची / प्रतिनिधी**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे महासचिव तथा गडचिरोली जिल्हा प्रभारी डॉ.नामदेवराव किरसान यांनी वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा न करता जिल्ह्यातील सद्याची पूरपरिस्थिती आणि त्यामुळे येथील लोकांचे विस्कळित झालेले जीवन पाहता गरजूंना १ लक्ष रुपयां पर्यत अन्यधान्य किट व इतर जीवनावश्यक वस्तूंचे वितरण करणार आहे. अचानक आलेल्या पुरामुळे अन्यधान्य वितरणाची गाडी पूरग्रस्तांपर्यत जाण्यास अडथळा येत असल्याने मार्ग मोकळे झाल्यावर लगेच अन्यधान्याची व इतर जीवनावश्यक वस्तुंची गाडी गरजूंना देण्यात येईल असे डॉ.नामदेव किरसान यांनी सांगितले.

यावेळी डॉ. नामदेव किरसान यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देतांना माजी खासदार तथा काँग्रेसचे जेष्ठ नेते मारोतराव कोवासे, गडचिरोली जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष महेंद्र ब्राम्हणवाडे, प्रदेश महासचिव तथा माजी आमदार डॉ.नामदेवराव उसेंडी, माजी आमदार पेंटाराम तलांडी, प्रदेश सचिव डॉ.नितीन कोडवते, डॉ.चंदाताई कोडवते, माजी जि.प.उपाध्यक्ष मनोहर पा.पोरेटी, शहर अध्यक्ष सतिश विधाते, काँग्रेसचे जेष्ठ नेते शंकरराव सालोटकर, ललित बरचा, महासचिव समशेरखान पठाण, प्रभाकर वासेकर, देवाजी सोनटक्के, रजनीकांत मोटघरे, वामनराव सावसाकडे, दामदेव मंडलवार, ॲड.गजानन दुगा, रमेश चौधरी, सुनील डोगरा, दीपक मडके, नेताजी गावतुरे, अतुल मल्लेलवार, विश्वजित कोवासे, अनिल कोठारे, विजय गोरडवार, नंदू कायरकर, सुनील चडगुलवार, राकेश रत्नावार, महादेव भोयर, अविनाश साळवे, सुभाष धाइत, आय.बी.शेख, डी.ऐन. रामने, घनश्याम मुर्वतकर, संजय चन्ने, घनश्याम वाढई, कुणाल पेंदोरकर, संजय पोरेड्डीवार, बाळासाहेब आखाडे, चारुदत्त पोहणे, अब्दुल पंजवानी, भैयाजी मुद्दमवार, बाबुराव गडसुलवार, श्रीकांत काठोते, रामभाऊ नन्नावरे, संदीप भैसारे, वसंत राऊत, दिवाकर निसार, ढिवरू मेश्राम, संजय नेरकर, कृष्णाजी झंजाळ, पुष्पलता कुमरे, अपर्णा खेवले, कल्पना नंदेश्वर, आशा मेश्राम सह मोठ्या संख्येने काँग्रेस कार्यकर्ते व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

## भक्तीसंगीतात तल्लीन झाले चंद्रपूरकर

### भाजपा आध्यात्मिक आघाडीचा उपक्रम

**चंद्रपूर / प्रतिनिधी**

मनुष्य हा आजीवन विद्यार्थी आहे.ज्यांच्याकडून काही ज्ञान प्राप्त होते.असे सर्व गुरू समान आहेत.आई-वडील हे प्रथम गुरू आहेत.गुरूचा सन्मान करणे ही भारताची परंपरा आहे.असे प्रतिपादन संत मनीष महाराज यांनी केले. ते भारतीय जनता पार्टी (शहर व ग्रामीण) आध्यात्मिक समन्वय आघाडी, जिल्हा चंद्रपूर तर्फे गुरुपौर्णिमेनिमित्त सर्व गुरुजनांना भावांजली अर्पण करण्याच्या उद्देशाने आयोजित १२ जुलैला प्रियदर्शनी सांस्कृतिक सभागृह येथे एक शाम गुरुजनों के नाम' या भक्ती संगीतमय कार्यक्रमात बोलत होते.या वेळी विधिमंडळ





लोकलेखा समिती प्रमुख तथा आमदार सुधीरभाऊ मुनगंटीवार यांचा शुभेच्छा व्हीडिओ संदेश प्रसारित करण्यात आला.यावेळी माजी केंद्रीय मंत्री हंसराज अहिर, जेष्ठ नेते चंदनसिंह चंदेल, भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ मंगेश गुलवाडे, देवराव भोंगळे, भाजपा महासचिव सुभाष कासन गोट्टूवार, रवींद्र गुरनुले, माजी उपमहापौर राहुल पावडे, आध्यात्मिक आघाडीचे शिल्पाताई देशकर, शैलेंद्र शुक्ला, राजकुमार पाठक भाजपा नेते शिला चव्हाण, माया उइके संदीप आगलावे, सचिन कोतपल्लीवार, दिनकर सोमलकर, विठ्ठल डुकरे, रवी लोणकर, डॉ किरण देशपांडे, सूर्यकांत कुचनवार, विनोद शेरकी धनराज कोवे, धम्मप्रकाश भस्मे, रुद्रनारायण तिवारी, रामकुमार आकेपेल्लीवार, राकेश बोमनवार, प्रवीण उरकुडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

प्रारंभी गुरूच्या प्रतिमेला माल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.यावेळी उपस्थित जनसमुदयाने

प्रजापिता ब्रम्ह कुमारी, गोंदवलेकर महाराज स्वामी समर्थ, संत गोरा कुंभार, संत रविदास, सत्य साई बाबा, मीरा बाई, श्री श्री रवि शंकर, निर्मला माता, साईं बाबा, स्वामी गजानन, भगवान बुद्धा, संत तुकडोजी महाराज, गुरु नानक, ठाकर सिंहजी महाराज, संत कबीर, गुरु हरी चाँद, ठाकुर, गुरुदेव दत्त यांची स्तुती करणाऱ्या भावगीतांचा आनंद घेतला. राजू गोयल, निभा सरकार, मंगेश देऊरकर, संजय नासिरकर, देवदत्त सातपुते, प्रणाली पांडे, स्वरूपा जोशी, श्याम झाडे, रोशनी वासमवार, विकास दुपारे, उर्वशी भूमकर, हिमांशू रंगारी, रिद्धी राऊत, निखिल शर्मा, रामानंद करूष, रश्मी हिवरे, राज ताटपल्लीवार, निभा सरकार, उर्वशी भूमकर, निकिता चंदनखेडे, अपर्णा घरोटे, जय काच्छेला यांनी भक्तीगीते सादर केली.

# रस्त्यावरील खड्डा ठरतोय जीवघेणा, विहीरगाव वडसी रस्त्यावरील वाहतूक बंद

## त्वरीत दुरुस्ती करून वाहतूक सुरू करा रिना पाटील यांची मागणी अन्यथा आंदोलन करु

**चिमूर / सुभाष खानोरकर**

तालुक्यातील वडसी वरुन विहीरगावकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोठं- मोठे खड्डे पडले असून पाणी जाण्याच्या वाटेतील पाईप फुटल्यामुळे रस्त्यावर मधोमध मोठा खड्डा पडल्यामुळे चारचाकी वाहनाची वाहतूक बंद झाली आहे.दुचाकी वाहन चालवताना नाहक त्रास होत असुन दुचाकी चालविताना मोठी कसरत करावी लागत आहे. अपघातांचा धोका निर्माण झाला आहे. पावसाड्याच्या दिवसात या परीसरातील नागरिकांना हाच एकमेव रस्ता असुन या रस्त्यावरील मोठ्या खड्याची त्वरीत दुरुस्तीकरुन वाहतूक सुरू करा अशी मागणी रिना पाटील यांनी केली आहे.

सदर रस्ता या परीसरातील गावांसाठी महत्त्वपूर्ण असुन दळणवळणाच्या दृष्टीने सोयीचा आहे.ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात व बफर झोन मध्ये जाण्यासाठी कोलारा गेट व बफर चे गोडमोहाळी बेलारा गेट,पडसगाव गेट, मदनापूर गेट,शिरखाळा गेटला जाण्यासाठी या रस्त्याने पर्यटक ये जा करीत असतात.याच मार्गाने पडसगाव,विहीरगाव, मदनापूर,मासळ या परीसरातील अनेक गावांतील नागरिक नवरगाव व नेरीकडे जाण्यासाठी हा मार्ग सोयीचा व जवळचा



असल्याने ये- जा करीत असतात. या रस्त्यावर नेहमी वर्दळ असते.याच मार्गावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या तपोभूमी श्रीक्षेत्र गोंदेडा येथे भेट देण्यासाठी पर्यटक येतात.या परीसरातील शेतकरी वर्ग याच रस्त्याने येणे-जाने करावे लागते.तसेच आता विद्यार्थ्यांना शाळा सुरू झाल्या विद्यार्थ्यांना याचं रस्त्याने येणे-जाणे करावे लागते.करीता त्वरीत रस्ता बनवा किंवा रस्त्यावर मुरुम तरी टाका अशा मागणीचे निवेदन उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग चिमूर,आमदार बटी भांगडीया चिमूर विधानसभा क्षेत्र यांना वडसी ग्राम पंचायत सदस्या रिना पाटील यांनी निवेदन दिले होते. या रस्त्यावर दुर्लक्ष केल्याने संततधार पावसामुळे रस्त्यावर मधोमध मोठा खड्डा पडल्यामुळे वडसी, विहीरगाव , वाघेडा,बेलारा ,पडसगाव,कडेगांव,पिपर्डी मदनापूर,मासळ कडे जाणारी चारचाकी वाहतूक बंद झालेली आहे.शेतक?याना शेती कामाचे दिवस असल्याने या रस्त्याची वाहतूक सुरू करा अन्यथा संबंधित विभागात येवुन आंदोलन करु असा इशारा रिना पाटील यांनी दिला आहे.

# वढोलीसह पाच गावांचा पाणीपुरवठा बंद

## ठेकेदाराचे दुर्लक्ष;कार्यवाहीची मागणी

**गोंडपिपरी / सूरज माडुरवार**

वढोली येथील प्रादेशिक पाणीपुरवठा योजना मागील सात दिवसांपासून बंद आहे.परिणामी या योजनेत समाविष्ट असलेल्या पाच गावांना ऐन पावसाळ्यात पाणी टंचाईची झळ बसत आहे.काही गावात नैसर्गिक पाण्याचे स्रोत नसल्याने गढूळ पाण्याने नागरिकांना तहान भागवण्याची दुर्दैवी वेळ नागरिकांवर आली आहे.

ही योजना मोरे ठेकेदारांमार्फत चालवल्या जाते या योजनेअंतर्गत वढोली,तारडा, फुर्डी हेटी, खरारपेठ, बोरगाव, चेकबोरगाव या पाच गावांचा समावेश आहे.वर्ष भरात ही योजना ठेकेदाराच्या व



अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे तीन ते चार महिने बंद असते.तात्काळ पाणी पुरवठा सुरू करा अन्यथा आंदोलन करू असा इशारा ग्राम पंचायत सदस्य संदीप पौरकार,नलिनी कोहपरे, सुरेंद्र मडप्ल्लीवार, सुवर्णा पोलोजवार या सदस्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे .एन पावसाळ्यात पाणीटंचाईची झळ बसल्याने नागरिक संताप व्यक्त करत आहे

# इनरव्हिल क्लब ऑफ वरोरा झाले पुरस्काराने सन्मानित

**वरोरा / प्रतिनिधी**

इनरव्हिल डिस्ट्रिक्ट ३०३ चां वार्षिक पुरस्कार वितरण सोहळा चाळीसगांव येथे पार पडला. इनरव्हिल क्लब ऑफ वरोरा च्या सन २०२१ ते २०२२ च्या अध्यक्षा मधू जाजू यांनी या कालावधीत अनेक सामाजिक उपक्रम राबविले . त्यांच्या उत्कृष्ट विविध उपक्रमांबद्दल त्यांना तब्बल पंधरा सन्मानचिन्ह देऊन या सोहळ्यात गौरविण्यात आले.

यामध्ये बेस्ट प्रेसिडेंट मधू जाजू , बेस्ट सी.सी. झेनब सिद्दिकोट , बेस्ट ट्रेझरर सुचेता पद्ममावार यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यांत



असोसिएशन गोल अंतर्गत स्त्री शक्ती, डिस्ट्रिक्ट ट्रॉफी रेन वॉटर हार्वेस्टिंग , वुमेन एम्प्लॉवरमेंट , रनिंग ट्रॉफी अंतर्गत भुसावळ क्लब ट्रॉफी , भट्टड ट्रॉफी , बी.डी. मालीवाल ट्रॉफी , लिटरसी ट्रॉफी अशा अनेक ट्रॉफींचा समावेश आहे .क्लब च्या माध्यमातून विविध सामाजिक कार्य करून वरोरा क्लब ने जनतेची सेवा करण्याची परंपरा कायम ठेवली आहे . सन्मानित केल्याबद्दल मधू जाजू यांनी डिस्ट्रिक्ट चेअरमन अश्विनी गुजराती,गिरीशा ठाकरे, मीनल लाठी, शिला देशमुख , रमा गर्ग , किर्ती चांदे आणि विद्या रघुशे यांचे आभार मानले .

# वाहतूक अभियानात विशेष कामगिरी करणाऱ्या ११ वाहतूक कर्मचाऱ्यांचा भद्रावती पोलीस ठाण्यात गौरव

**भद्रावती / प्रतिनिधी**

मागील काही महिन्यात वाहतूक विभागाकडून चालविण्यात आलेल्या वाहतूक सुरक्षा अभियानांतर्गत विशेष व उल्लेखनीय कार्य करणा?या वरोरा उपविभागातील ११ वाहतूक पोलीस कर्मचा?यांना भद्रावती पोलीस ठाण्यात पार पडलेल्या एका सभेत प्रमाणपत्र तथा रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. यात भद्रावती पोलीस ठाण्यातील ३ वरोरा पोलीस ठाण्यातील ६ तर माजरी पोलीस ठाण्यातील २ वाहतूक पोलीस कर्मचा?यांचा



समावेश आहे. या सर्वांना वरोरा उपविभागीय पोलीस अधिकारी आयुष नोपाणी यांच्या हस्ते सदर प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी आयुष नोपानी, भद्रावतीचे ठाणेदार गोपाल भारती, वरोराचे ठाणेदार खोब्रागडे तथा माजरीचे ठाणेदार देवरे उपस्थित होते. सन्मानित करण्यात आलेल्या भद्रावती पोलीस ठाण्यातील कर्मचा?यांमध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक राजू बेलेकर, पोलीस कॉन्स्टेबल विकी परचाके व तनुज टेकाम यांचा समावेश आहे. सदर मोहिमेंतर्गत वाहतूक नियमांबद्दल जनजागृती करीत अपघात न घडण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले होते. या पोलीस विभागाला उल्लेखनीय यश प्राप्त झाले. या अभियानादरम्यान भद्रावती पोलीस ठाणे अंतर्गत ११०० वरोडा ठाणे अंतर्गत १९०० तर माजरी पोलीस ठाणे अंतर्गत ५०० वाहतुकीच्या विविध केसेस करण्यात आल्या. यातून जवळपास १७ लक्ष रुपयाचा महसूल प्राप्त झाला.

## महिला लोकशाही दिनाचे आयोजन

**चंद्रपूर / प्रतिनिधी**

जिल्हास्तरावर महिला लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. या महिन्याचा महिला लोकशाही दिन सोमवार, दि. १८ जुलै २०२२ रोजी निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या दालनात सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात येत आहे.

या महिला लोकशाही दिनी न्याय प्रविष्ठ प्रकरणे, सेवाविषयक आस्थापने विषयक बाबी, अशी प्रकरणे आणि विहीत अर्जात नसलेली प्रकरणे स्विकारण्यात येणार नाहीत.

# विवेकानंद महाविद्यालयात 'घर घर झेंडा' या उपक्रमांतर्गत सभा



**भद्रावती / प्रतिनिधी**

स्थानिक विवेकानंद महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत 'घर घर झेंडा' या उपक्रमाविषयी जागृती अभियान आयोजनार्थ विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव उमाटे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या सभेत महाविद्यालयातील महाविद्यालयातील वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील प्राध्यापक उपस्थित होते. विद्यार्थ्यांसाठी एका विशेष सभेचे आयोजन करून घर घर झेंडा या कार्यक्रमाचे महत्त्व समजावून देणे. सोशल मीडियाचा वापर करून समाजामध्ये या उपक्रमाविषयी जागरूकता निर्माण करणे यासह अनेक निणऱ्य घेण्यात आले.या सभेत डॉ. विजय टोंगे, डॉ. बंडू जांभुळकर, डॉ उत्तम घोसरे, डॉ ज्योती राखुंडे, डॉ सुधीर आष्टुनकर, डॉ यशवंत घुमे, डॉ प्रकाश तितरे, डॉ.रमेश पारेलवार, डॉ गजानन खामनकर, डॉ सुहास तेलंग,प्रा संगिता बांबोळे,प्रा अमोल ठाकरे, प्रा.रामकृष्ण मालेकर, प्रा.खोजराज कापगते,प्रा.नरेंद्र लांबट यांसह अनेक प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

# वडसा ते चंद्रपूर मार्गावरील सकाळची पँसेजर रेल्वेगाडी सुरु करा

## भाजयुमो महानगर जिल्हा कार्यकारिणी सदस्य महेश कोलावारांची आ. सुधीर मुनगंटीवार यांच्यामार्फत रेल्वे मंत्रालयाकडे मागणी

**चंद्रपूर / प्रतिनिधी**

वडसा ते चंद्रपूर मार्गावरील सकाळची पँसेजर रेल्वेगाडी सुरु करण्याची मागणी भाजयुमो महानगर जिल्हा कार्यकारिणी सदस्य महेश कोलावार यांनी केली आहे.

याबाबतचे निवेदन आ.सुधीर मुनगंटीवार यांच्यामार्फत रेल्वे मंञलयाकडे पाठविण्यात आले आहे.

सदर निवेदनातून महेश कोलावार यांनी म्हणाले की कोरोना काळात बहुतांश रेल्वेगाड्या बंद होत्या.त्यानंतर कोरोना काळाच्या शिथिलेनंतर काही गाड्या सुरु करण्यात आले.त्यात गोंदिया ते बल्लारशाह या मार्गावरील दोन पॅसेंजर गाड्यांचा समावेश आहे.माञ वडसा ते चंद्रपूर दरम्यान सकाळच्या वेळेस जिल्हा ठिकाणापर्यंत चालणा-या पँसेजर रेल्वेगाडी अजूनपर्यंत सुरु करण्यात आलेली नाही.



रेल्वेनी प्रवास करणा-या प्रवाशांना अत्यंत सोयीची असलेली सकाळची पँसेजर बंद असल्याने प्रवाशांना याचा नाहक ञस सहन करावा लागत आहे.दुसरीकडे लालपरीचे टिकीटही भरमसाठ महागले आहे.त्यामुळे खासगी व सरकारी वाहनाने प्रवास करु इच्छिणा-या सर्व सामान्याला महागाईचा फटका बसत आहे.

वडसा शहर हे गडचिरोली जिल्ह्यातील एकमेव रेल्वे स्थानक आहे.या रेल्वेस्थानकावरुन सकाळच्या सुमारास कोरची, आरमोरी, गडचिरोली पासून तर नागभीड, मुल तालुका पर्यंतचे प्रवासी, सरकारी कर्मचारी, विद्यार्थी, छोटे-मोठे उद्योजक या रेल्वेगाडीने प्रवास करतात.

सध्याच्या परिस्थितीत सर्वकाही सुरळीत आहे तरीही सदर रेल्वेगाडी सुरु केल्या नसल्याने प्रवाशांमध्ये नाराजीचे स्वर दिसत आहे.

तरी या निवेदनाची दखल घेऊन लवकरात-लवकर सकाळची पँसेजर रेल्वेगाडी सरु करावी अशी मागणी महेश कोलावार यांनी केली आहे.

# भाजप जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांनी केला पुरग्रस्त भागाचा दौरा



**चंद्रपूर / प्रतिनिधी**

जिल्ह्यात सातत्याने सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे सर्वत्र पुरपरिस्थीती निर्माण झाली आहे.वर्धा नदीला पूर आल्याने श्रीक्षेत्र वढ्यालाही पुराचा फटका बसला. गावामध्ये पुराचे पाणी घुसल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या सूचनेनुसार याठिकाणी भेट देऊन देवराव भोंगळे यांनी पुरपरिस्थितीची पाहणी केली. पूरग्रस्तांना भेटून त्यांचे प्रश्न जाणून घेतले. काळजी करू नका. प्रशासनाच्या वतीने सहकार्य सुरू आहेच. परंतु सध्या पाऊसाचा जोर कायम असल्यामुळे पुराचे पाणी वाढल्याने काही अडचण निमाण झाल्यास नागरिकांनी भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या मार्फतीने कळवावे. आम्ही सदैव सोबत आहोत असे गावकऱ्यांना भोंहले यांनी सांगितले. यावेळी, जिल्हा महामंत्री नामदेव डाहुले, माजी जि. प. सदस्य रंजीत सोयाम, बंटी भोस्कर, विलास पुरटकर, सचिन कपाडे, किसन वरारकर, महेंद्र वरारकर सोबत होते.

# सामुहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करणाऱ्या संस्थांनी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**चंद्रपूर / प्रतिनिधी**

जिल्हा महिला व कालविकास अधिकारी कार्यालयाद्वारे जिल्ह्यातील शेतकरी, शेतमजुर, निराधार, परितक्त्या, विधवांच्या मुलींच्या विवाहकरीता शुभमंगल नोंदणीकृत / सामुहिक विवाह योजना राबविण्यात येते. सदर योजनेच्या अनुदानास पात्र ठरण्यासाठी लाभार्थ्यांच्या वडीलांचे वार्षिक कमाल उत्पन्न मर्यादा एक लाख रुपये इतकी आहे. अशा कुटुंबातील मुलींच्या विवाहासाठी प्रति जोडपे १० हजार रुपये, शासन निर्णयातील विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून लाभार्थ्यांना देण्यात येतात. सदर योजना ही स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात येत असून संस्थांना ५ ते १०० जोडप्यांचा समावेश करता येतो. तसेच सर्व कागदपत्रे विवाह सोहळ्याच्या किमान एक महिना अगोदर अटी व शर्तीच्या अधिन राहून महिला व बालविकास अधिकारी कार्यालयास अर्जासह सादर करणे आवश्यक आहे.

# पोलीस विभागाच्या लेखी आश्वासनानंतर सागरा ग्रामस्थांचे आमरण उपोषण मागे

## सरपंच संघटनेचे अध्यक्ष प्रदिप महाकुलकर यांची मध्यस्थी



**भद्रावती / प्रतिनिधी**

तालुक्यातील सागरा गावातून अवैध दारु विक्री व जुगार अड्डे कायमस्वरूपी बंद करा. या प्रमुख मागणी साठी सरपंच शंकर रासेकर यांच्यासह सागरा ग्रामस्थानी दि. ११ जुलै रोज सोमवारपासून आमरण उपोषण सुरू केले होते. अखील भारतीय सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष प्रदिप महाकुलकर यांनी या प्रकरणात मध्यस्थी करून पोलीस प्रशासनाला या समस्येवर तात्काळ उपाययोजना करा. असे आवाहन केले. शेगांव ( बु. ) चे पोलीस निरीक्षक अविनाश मेश्राम यांनी अवैध दारु विक्री व जुगार खेळणाऱ्यावर त्वरीत कठोर कार्यवाही करण्याचे लेखी आश्वासन सरपंच शंकर रासेकर यांना दिले. यानंतर सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष प्रदिप महाकुलकर व पोलीस निरीक्षक अविनाश मेश्राम यांच्या प्रमुख उपस्थितीत काल दि. १२ जुलै रोजी सरपंच शंकर रासेकर यांच्यासह सागरा ग्रामस्थानी आमरण उपोषण मागे घेतले.

पोलीस स्टेशन शेगाव ( बु. ) च्या वतीने सरपंच शंकर रासेकर यांना दिलेल्या लेखी आश्वासनात असे नमुद करण्यात आले की, सागरा येथील अवैध दारू विक्री व जुगार बंद करण्यासाठी सागरा गावात सकाळ - संध्याकाळ पोलीस गस्त सुरू करण्यात येईल. सागरा ग्रामस्थांनी सदर समस्ये संदर्भात पोलीस विभागाशी दुरध्वनी व मोबाईल नंबरवर सुध्दा संपर्क साधावा. अवैध दारु विक्रेते व जुगार खेळणाऱ्यावर त्वरीत कार्यवाही करण्यात येईल. पोलीस विभागाला सहकार्य होईल याद्दष्टीने गावात महिला व पुरुष यांची समिती गठीत करुन त्यांची नावे व मोबाईल क्रमांक पोलीस स्टेशनमध्ये सादर करावे. असेही या निवेदनात नमुद केले आहे.

सरपंच शंकर रासेकर यांच्या नेतृत्वात सागरा येथे सुरू झालेल्या आमरण उपोषण आंदोलनात युवराज निबुदे, दिनेश आसुटकर, ईश्वर वाग्दरकर, गणपत घाटे, गुलाब बांदुरकर, बंडु बांदुरकर, नत्थु झाडे, भारत जुनारकर, वसंता अडकिने, उध्दव बोबडे, संगीता सरोदे, जया खाडे, त्रिवेना बांदुरकर, कलावती अडकिने, मंदा वाग्दरकर, माधुरी आवडे, सखुबाई रासेकर, वैशाली जुनारकर आणि कमला बोबडे तसेच इतर गावकरी सहभागी झाले होते.

# घर कोसळून वृद्ध महिला जखमी घुग्घुस भाजपातर्फे तत्काळ मदत

**घुग्घुस / प्रतिनिधी**

परिसरात मागील सात दिवसापासून संततधार पाऊस सुरु असल्याने पौर्णिमा विठ्ठल वाघमारे रा. वार्ड क्र. १ घुग्घुस या वृद्ध महिलेच्या घराची भिंत गुरुवार १४ जुलै रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास कोसळली वृद्ध महिला घरात असल्याने घराचे कवेलू व लाकडी फाटे तीच्या अंगावर पडले यात ती जखमी झाली तीला लगेच भाजपा कार्यकर्त्यांनी प्रा.आ.केंद्रात उपचारासाठी भर्ती केले.

याबाबत कळताच भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे, तलाठी कार्तिक आत्राम, परशुराम पेंदोर, भाजपाचे राजेश मोरपाका, राजू डाकूर यांनी प्रा. आ. केंद्रात जाऊन वृद्ध महिला पौर्णिमा वाघमारे यांची भेट घेतली व विचारपूस केली तसेच घटनास्थळी जाऊन नुकसानग्रस्त घराची पाहाणी केली. भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष यांनी भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे



यांच्याशी भ्रमणध्वनी वरून चर्चा करून याबाबतची माहिती दिली त्यांनी सर्वतोपरी मदत करण्याचे सांगितले व वरिष्ठ अधिकाऱ्यांशी भ्रमणध्वनी वरून चर्चा केली. तलाठी कार्तिक आत्राम यांनी पंचनामा केला. भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे यांनी वाघमारे दाम्पत्यांना जेवणाची व्यवस्था करून दिली तसेच सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले.

आनंद वाघमारे हे वयोवृद्ध असून सकाळी गाय चारण्यासाठी बाहेर गेले होते त्यामुळे ते थोडक्यात बचावले. वाघमारे कुटुंबाची परिस्थिती गरिबीची असल्याने व त्याने कवेलूचे राहते घर कोसळल्याने मोठे नुकसान झाले असून ते बेघर झाले आहे. बेघर झालेल्या वाघमारे कुटुंबियांना राहण्याची पर्यायी व्यवस्था भाजपातर्फे करण्यात येणार आहे.भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे यांनी नपचे मुख्याधिकारी यांची भेट घेऊन मदत मिळवून देण्यासाठी चर्चा केली व नुकसान भरपाई मिळण्यासाठी प्रस्ताव पाठविला आहे.